## महिला व बाल कल्याण योजना :-

महिलांचा आर्थिक व सामाजिक विकास घडवुन आणण्यासाठी त्यांचा नियोजनात, विकास प्रक्रियेत,निर्णय प्रक्रियेत, प्रशासनात व राज्यसत्तेत सहभाग असणे आवश्यक आहे. हे साध्य करण्यासाठी त्यांना औपचारीक शिक्षण, व्यवसाय प्राशिक्षण , क्षमता वृध्दी , आरक्षण, कायद्याचे ज्ञान आणि त्यांना हक्क व आधिकारांची जाणीव करुन देणे, तसेच त्यांना मुख्य प्रवाहात आणणे आवश्यक आहे. महिला असंघटित असणे हा त्यांच्या विकासातील प्रमुख अडसर असल्याने त्यांना स्वंयसहाय्यता बचत गटांच्या माध्यमातुन संघटित करणे ही स्वंयसहाय्यता चळवळीतील काळाची गरज आहे. महिलांना विकासाच्या प्रक्रियेत सामावुन घेऊन स्वराज्य विकास संस्थांनी निर्माण केलेली साधन सामग्री देखरेखीसाठी महिलांच्या ताब्यात देणे म्हणजे योजनांची मालकी लोकांकडे सोपविणे असा होईल. यामुळे सामाजिक बांधिलकी निर्माण होऊन ही साधन सामग्री टिकाऊ व उपयुक्त ठरेल. महिलांचा स्व चा विकास होईल, कुटूंब, समाज आणि पर्यायाने देशाचा विकास त्यांना सक्षम केल्यामुळे घडविता येऊ शकेल.

महिला व विशेष दुर्बल घटकातील महिला या प्रत्येक ठिकाणी दुर्लक्षित व शोषित घटक आहेत. विकास योजनेतील त्यांचे स्थान नगण्य असते आणि अनेकदा सामाजिक क्षेत्रातही त्यांची हवी तशी दखल घेतली जात नाही. महिला व बालविकासाच्या कल्याणासाठी विविध प्रकारच्या योजना राबविण्यात येत आहेत.

**१)** ठामपा शाळेतील दुर्बल घटकातील मुलीच्या पालकांनी उपस्थिती भत्ता इयत्ता १ ली ते ७ वी प्रतिवर्षी प्रति विद्यार्थी रु २०००/- ( इयत्ता १ ली ते ७ वी, इयत्ता ८ वी १० वी)

**२)** ठामपा शाळेतील इयत्ता १ ली ते ७ वी प्रतिवर्षी प्रति विद्यार्थी रु १०००/- इयत्ता ८ वी १० वी प्रतिवर्षी प्रति विद्यार्थी रु २०००/-

**३)** नोंदणीकृत महिला मंडळ / संस्था /बचत गट यांच्यासाठी मिरची कांडप मशीन/पापड मशीन /शेवया मशीन /पेपर प्लेट मशीन पुरविणे.

**४)** निराधार निराश्रीत,विधवा महिलांच्या मुलीच्या विवाह करीता अनुदान

**५)** आर्थिक व दृष्टया गरीब कुटूंबातील महिलांना व मुलींना स्वयंरोजगारासाठी अनुदान

**६)** विधवा / घटस्फोटीत / परितक्त्या महिलांना स्वंयरोजगारासाठी अनुदान

**७)** ठामपा माध्यमिक शाळेतील विद्यार्थी यांना स्वंयरक्षणासाठी व त्यांच्या शारीरीक विकासासाठी कराटे प्रशिक्षण योजना प्रशिक्षण सत्र : ३ महिने लाभार्थी ८००X १०००/-

**८)** ठामपा शाळेतील इयत्ता ८ वी तील मुलींना तसेच ठामपा क्षेत्रातील आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील इयत्ता ८ वी मध्ये खाजगी शासनमान्य शाळेमध्ये शिक्षण घेत असलेल्या मुलींना मोफत सायकल पुरविणे

**९)** ठामपा शाळेतील व इतर किशोरवयीन मुलींना जीवनकौशल्य प्रशिक्षण कार्यक्रम राबविणे

**१०)** ठा.म.पा कडे नोंदणीकृत असलेल्या व क्षमता बांधणी प्रशिक्षण घेतलेल्या महिलासाठी व मुलीसाठी स्वयंरोजगार सुरु करण्याकरीता तसेच ठामपा क्षेत्रातील अर्ज केलेल्या सर्व पात्र महिलांना विविध व्यवसायाचे प्रशिक्षण देणे (सर्व प्रकारचे प्रशिक्षण देणे :- उदा. व्यवसायीक व घरगुती सर्व विद्युत उपकरणे (संगणक, इस्त्री, फ्रिज, वॉशिंग मशीन, टिव्ही, मोबाईल, इत्यादी दुरुस्ती करणे), टेलरींग कोर्स, ब्युटी पार्लर कोर्स,फॅशन डिझायनिंग, ड्रायव्हींग प्रशिक्षण, इंग्लिश स्पिकींग कोर्स, व्यक्तीमत्व विकास प्रशिक्षण, बालवाडी शिक्षीका, शासकीय व अशासकीय नोकरी बाबत प्रशिक्षण इत्यादी प्रशिक्षण देणे.

**११)** ठाणे महापालिकेच्या सर्व शाळेमधील मुलांसाठी आरोग्य तपासणी शिबिरांचे आयोजन करणे

**१२)** महिला व मुलीसाठी विविध स्पर्धाचे आयोजन करणे व त्याद्वारे त्यांच्या कलागुणांना प्रोत्साहन देणे (प्रति प्रभाग समिती दोन)

**१३)** देशात परदेशात उच्च शिक्षणाकरिता होतकरु मुली व महिलांना अर्थसहाय्य (अल्प व मध्यम उत्पन्न गट)

**१४)** देशात परेदशात विविध स्पर्धा /राष्ट्रकुल /ऑलम्पीक स्पर्धा करिता मुली व महिलांना अर्थसहाय्य

**१५)** ठाणे महापालिकेतील सर्व नोंदण्रीकृत बचत गटांना पायाभुत व क्षमता बांधणी प्रशिक्षण देणे

**१६)** महिला बचत गटांच्या व महिला मंडळानी तयार केलेल्या वस्तुचे विक्री व प्रदर्शनामध्ये स्टॉल लावणे /विक्री केंद्र उभारणे (प्रति प्रभाग समिती १ )

**१७)** सुवर्ण जयंती शहरी रोजगार योजने अंतर्गत येणा-या बचत गट व इतर महिलांसाठी विविध कार्यक्रम राबविणे.

**१८)** ३ जानेवारी २०१२ रोजी क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले जयंती भव्य स्वरुपात साजरी करणे व सास्कृतिक कार्यक्रम मान्यवर महिलांचा परिसवाद मेळावा आयोजित करणे

**१९)** जिजामाता महिला आधार योजने अंतर्गत अनुदान देणे :- महानगरपालिका क्षेत्रातील व आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील कुटूंब प्रमुख (कुटूंबातील पुरुष / स्त्री कर्त्या व्यक्तीचे निधन झाल्यास (वय २१ ते ७०) त्यांच्या कुटूंबियास रु २५०००/- अर्थसहाय्य ठामप ा कडुन देणे तसेच अपघाती निधना व्यतिरिक्त सदर व्यक्तीस कायमस्वरुपी अपंगत्व आले असेल तरीही रु २५०००/- एक रक्कम अर्थसहाय्य देण्यात येईल या योजनेचा लाभ फक्त आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (बी पी एल साठी प्राधान्य))

**२०)** योजना प्रसिध्दी पुस्तीका जाहिरात आकस्मिक व किरकोळ योजनांचे Software तयार करणे ,डेटाइन्ट्री करणे व कार्यालयीन इतर खर्च

**२१)** सन्मा.महिला प्रतिनिधीचा अभ्यास दौरा (महिला व बालकल्याण योजने अंतर्गत राबविण्यात येणा-या विविध योजनांचा अभ्यास करणे सन्मा पदाधिकारी व सन्मा सदस्यांना असलेले अधिकार कर्तव्य कार्यालयीन कामकाजाची पध्दत विविध शासकीय व योजनाची माहिती घेणे.)

**२२)** हुंडा पध्दतीच / महिला वरील अन्याय अत्याचार प्रती निर्मुलन होणेसाठी व भ्रुणहत्या रोखणेसाठी विविध कार्यक्रमांचे आयोजन स्वयंसेवी संस्थामार्फत करणे हुंडयाच्या प्रचलित असलेल्या अनिष्ट रुढीचे कायमचे उच्चाटन करण्यासाठी व जनजागरण प्रसार व प्रसिध्दी देणे पदनाटय व विविध कार्यक्रम सादरीकरण करणे प्रति प्रभाग समिती दोन

**२३)** ठामपा क्षेत्रातील नोंदणीकृत बचत गटांना अनुदान देणे (ज्या बचत गटांनी योजना क्र ३ चा लाभ घेतला नाही तसेच यापूर्वी अनुदानाचा लाभ घेतला नाही अशाच बचत गटांना अनुदान देय राहील.)

**२४)** ठामपाचे पाळणाघर चालविणे स्वयंसेवी संस्थाना आर्थिक मदत करणे पाळणाघरासाठी साहित्य पुरविणे सुविधा पुरविणे इ साठी.

**२५)** बालवाडयांना अल्पोपहार पोषण आहार व बिस्किटे

**२६)** रस्त्यावरील मुले व घरातुन पळुन आलेली मुले यांच्यासाठी रात्रीचे निवारे विशेष शाळांची व्यवस्था करणे स्वयंसेवी संस्थाची मदत घेणे यासारखे उपक्रम राबविण्यासाठी

**२७)** महिलासाठी समुपदेशन केंद्र चालविणे

**२८)** आतंरजातीय विवाहसाठी अनुदान देणे

**२९)** ठामपा प्राथामिक शाळेतील विद्यार्थ्यासाठी खालीप्रमाणे योजना प्रस्तावित केलेल्या आहेत.

(१) पौष्टिक आहार (२) गणवेश (३) शैक्षणिक साहित्य (४) वहया (५) दप्तर (६) वॉटर बॅग (७) चप्पल/शुज व मोजे (८) रेनकोट (९) स्काऊट,गाईड/ कॅम्प व प्राशिक्षण (१०) शाळा कार्यालय फर्निचर (११) प्रयोगशाळा साहित्य खरेदी व परिपूर्ती (१२) स्वेटर मुले, मुली (१३) शाळासाठी आधुनिक माहिती तंत्रज्ञान शैक्ष साहित्य (१४) क्रीडा साहित्य /शारि शिक्षण साहित्य. (१५) प्रश्नपत्रिका,उत्तरपत्रिका छपाई (१६) शाळा कार्यालय छपाई (१७) विद्यार्थी ओळखपत्र (१८) चतुर्थ कर्मचारी व वाहन चालक गणवेश (१९) कार्यालय स्टेशनरी (२०) नविन इंग्रजी माध्यम शाळा साहित्य (२१) विद्यार्थी लंचबॉक्स

**३०)** बालिका समृध्दी योजना ,आर्थिकदृष्टया दुर्बल घटकातील (१ एप्रिल २०१२ नंतर जन्मलेल्या मुलीस अर्थसहाय्य देणे कुटूंबातील जास्तीत जास्त दोन मुलीस देण्यात येईल दोन पेक्षा जास्त अपत्यांस लाभ दिला जाणार नाही.)